महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७८ वा | दिनांक : ०५/०९/२०२५ | वार : शुक्रवार

## मराठा समाजाचा जीआर सरसकटचा नाही : खरे कुणबी असतील त्यांना आरक्षण मिळेल - मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती



**मुंबई :** मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारने काढलेल्या जीआरविषयी वेगवेगळे मतमतांतर व्यक्त केली जात असताना आता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा जीआर मराठा समाजाला आरक्षणाचा सरसकटचा लाभ देणारा नसल्याचे स्पष्ट केले आहे राज्य सरकारने मराठा आरक्षणाविषयी काढलेला जीआर सरसकटचा नाही. या प्रकरणी जे खरे कुणबी असतील त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळेल. या प्रकरणी कुणालाही खोटेपणा करता येणार नाही, असे ते म्हणालेत.

मराठा आरक्षणाशी संबंधित सरकारने काढलेल्या जीआरवर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांनी हा जीआर दिशाभूल करणारा असल्याचा आरोप केला आहे. पण स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी या जीआरमुळे मराठवाड्यातील मराठ्यांचे भले झाल्याचा दावा केला आहे. विशेषतः या प्रकरणी ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ नाराज झाल्याची चर्चा आहे. त्यांनी या प्रकरणी कॅबिनेटलाही दांडी मारली आहे. पत्रकारांनी गुरूवारी हा मुद्दा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे उपस्थित केला. त्यावर त्यांनी भुजबळ नाराज नसल्याचे नमूद करत सरकारचा जीआर सरसकट आरक्षण देणारा नसल्याचे स्पष्ट केले.

मुख्यमंत्री या मुद्यावर भाष्य करताना म्हणाले, छगन भुजबळ हे मंत्रिमंडळातून कुठेही निघून गेले नाहीत. त्यांची व माझी चर्चा झाली. मी त्यांना आश्वस्त केले आहे की, सरकारच्या जीआरमुळे ओबीसी समाजाला कोणताही धक्का बसणार नाही. हा सरसकट जीआर नाही. हा पुराव्याचाच जीआर आहे. फक्त मराठवाड्यात इंग्रजांचा राज्य नव्हते. तिथे निझामाचे राज्य होते. त्यामुळे इंग्रजांच्या राज्यातील पुरावे हे इतर ठिकाणी मिळतात, तसे मराठवाड्यात मिळत नाहीत. मराठवाड्यातील पुरावे हे निजामाच्या म्हणजे हैदराबाद गॅझियटमध्ये मिळतात. त्यामुळे तेथील पुरावे आपण ग्राह्य धरले. त्यामुळे जे खरे कुणबी असतील त्यांनाच हे आरक्षण मिळेल.

ते पुढे म्हणाले, मला असे वाटते की, यातून (जीआर) जे काही खरे हक्कदार आहेत, त्यांनाच ते मिळेल. पण कुणालाही खोटेपणा करता येणार नाही. अशा प्रकारचा हा जीआर आहे. अनेक ओबीसी संघटनांनी त्याचे स्वागत केले आहे. आमच्या मनात कोणतीही शंका नाही असे त्यांचे म्हणणे आहे. भुजबळ व इतर नेत्यांच्याही मनातील शंका आम्ही दूर करू. ओबीसी नेत्यांनाही एक गोष्ट माहिती आहे की, जोपर्यंत हे राज्य आहे तोपर्यंत ओबीसीवर अन्याय होऊ शकत नाही. जोपर्यंत हे राज्य आहे तोपर्यंत एका समाजाचे काढून दुसऱ्या समाजाला देण्याचा विचार होऊ शकत नाही. आम्ही मराठ्यांचे मराठ्यांना देणार, ओबीसीचे ओबीसींना देणार आणि ज्यांना खरा अधिकार आहे त्यांना ते ते देणार. कुणाचे काढून कुणाला केव्हाच देणार नाही. दोन समाजाला एकमेकांपुढे केव्हाच उभे करणार नाही.

फडणवीस म्हणाले, अनेकदा समजुती गैरसमजुती होतात. अनेकदा काही लोक जाणिवपूर्वक गैरसमजुती तयार करतात. पण आम्ही जे काही राजकारण शिकलो, त्या राजकारणात 'पथ का अंतिम लक्ष्य नहीं है, सिंहासन चढते जाना. सब समाज को लिए साथ में, आगे है चलते जाना', हे आमचे ब्रिद वाक्य आहे. त्यामुळे सगळ्यांना सोबत घेऊन आम्हाला पुढे जायचे आहे. मराठा समाज एक महत्वाचा समाज आहे. या महाराष्ट्राच्या जडणघडणीत एक मोठे योगदान देणारा हा समाज आहे. पण त्यासोबतच ज्या अठरापगड जाती आहेत, ज्यांनी स्वराज्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे मावळे म्हणून काम केले आहे. त्यांनीही बलिदान दिले आहे. कुणावरही अन्याय होऊ नये ही आमची भावना आहे. ही भावना पुढेही राहील.

राज्य सरकारने मराठा आंदोलकांवरील यापूर्वीचे गुन्हे मागे घेण्याचा शब्द दिला आहे. पण या प्रकरणी आणखी ९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्याचे काय करणार? असा प्रश्न पत्रकारांनी यावेळी फडणवीसांना विचारला. त्यावर त्यांनी हे गुन्हे उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार दाखल करण्यात आल्याचे सांगितले. आत्ताचे गुन्हे हायकोर्टाच्या आदेशांनुसार दाखल झालेत. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणूनच त्यावर योग्य तो निर्णय घ्यावा लागेल.

## भाजपने मनोज जरांगेंना गंडवले, फसवले - आंबेडकरांचा दावा



**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मनोज जरांगे यांच्यासह सर्वांनाच गंडवल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला 'कुणबी' संबोधण्याचा जीआर काढून मोठा गाजावाजा केला. भाजपने असा आव आणला की, न सुटणारा प्रश्न त्यांनी सोडवला. मात्र प्रत्यक्षात हा निर्णय गंडवणारा व फसवणारा आहे, असे ते त्यांनी म्हटले आहे. आंबेडकरांनी याविषयी हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाच्या विविध निर्णयांचा दाखला दिला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न खरेच सुटला काय? याविषयी साशंकता निर्माण झाली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण केले. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने एक जीआर काढला. त्या जीआरद्वारे सरकारने हैदराबाद गॅझेट लागू केल्याची घोषणा केली. या जीआरमुळे मराठवाड्यातील सर्वच मराठा समाजाचे कुणबीमध्ये रुपांतर होऊन त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळेल असा दावा केला जात होता. पण आता या जीआरवर वेगवेगळी मतमतांतरे येत आहेत. कायदेतज्ज्ञ तथा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही सरकारचा हा जीआर गंडवणारा व फसवणारा असल्याचा आरोप केला आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, भाजपने सर्वांनाच गंडवले आहे! महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला 'कुणबी' संबोधण्याचा जीआर काढून मोठा गाजावाजा केला. भाजपने असा आव आणला की, न सुटणारा प्रश्न त्यांनी सोडवला. मात्र हा निर्णय गंडवणारा व फसवणारा आहे. "भाजपने मराठा आरक्षणासाठीची नेमलेली शासकीय उपसमिती, न्या. शिंदे समिती, मराठा समाज, मनोज जरांगे पाटील आणि कुणबी या सर्वांना फसवले आहे."

जगन्नाथ डी. होल विरुद्ध महाराष्ट्र राज्य सरकार या प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालात, न्यायालयाने पॅराग्राफ १३ मध्ये म्हटले आहे की, सर्व मराठा समाजाला कुणबी संबोधता येणार नाही. त्याआधीच्या पॅराग्राफमध्ये "कुणबी ही जात नसून व्यवसाय आहे" असे न्यायालयाने स्पष्ट नमूद केले आहे. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयातही टिकला आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केलय की, सर्व मराठा हे कुणबी आहेत, असं सरसकट धरता येत नाही. त्यामुळे भाजपने जीआर मार्गे काढलेला निर्णय चुकीचा व दिशाभूल करणारा आहे.

"ओबीसींना स्वतःच्या हक्कासाठी आता लढा द्यावा लागेल. आंदोलन, मोर्चे, बैठका घ्याव्या लागतील आणि ओबीसी मंत्र्यांनी कॅबिनेटमध्ये दबाव आणणे गरजेचे आहे."

वंचित बहुजन आघाडीची ठाम भूमिका आहे की, मराठा आरक्षणाचे ताट वेगळे आणि ओबीसी आरक्षणाचे ताट वेगळे असले पाहिजे. मराठा समाजाचे ताट वेगळे असले तरच मराठा समाजाला आरक्षण मिळू शकते. मात्र, शासनाने सर्व मराठे कुणबी समजावेत, असा जीआर काढून भाजपने अजित पवार, एकनाथ शिंदे व उबाठा, मराठा समाज यांनाही गंडवले आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

## ओबीसी उपसमितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी चंद्रशेखर बावनकुळेंवर



**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागणीनंतर, ओबीसी समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हैदराबाद गॅझेटनुसार पात्र मराठा शेतकऱ्यांना कुणबी, म्हणजेच ओबीसी प्रमाणपत्र मिळणार आहे, असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सरकारच्या या निर्णयाला ओबीसी समाजाने तीव्र विरोध दर्शवला असून, जीआरची होळी करत त्यांनी निषेध व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर, ओबीसी समाजाची नाराजी दूर करण्यासाठी राज्य सरकारने एक मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर बावनकुळे यांची निवड करण्यात आली आहे. या समितीत मंत्री छगन भुजबळ, पंकजा मुंडे, आणि संजय राठोड यांचाही समावेश आहे. समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर बावनकुळे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ओबीसी समाजासाठी काल मंत्रिमंडळ उपसमिती जाहीर केली, त्यात भुजबळ, पंकजा मुंडे असे सर्व नेते आहेत. मोदीजींनी ओबीसी आयोगाला संविधानिक दर्जा केंद्रात दिला आहे. ओबीसींच्या योजना कार्यान्वित आहेत का, निधी आहे का? याची देखरेख करण्याची या समितीची जबाबदारी आहे. ओबीसी समाज आहे, त्यात काहींना प्रमाणपत्र मिळत नाही, जात पडताळणी होत नाही, अशा घटकांसाठी काम करायचे आहे, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काँग्रेसने आतापर्यंत तोंडाच्या वाफा फेकल्या आहेत, जातिनिहाय जनगणना केली नाही. आता ओबीसीमध्ये ३५३ जाती आहेत, १८ पगड जातीमधील ओबीसींची जनगणना आहे, त्यात सरकारची काय मदत लागेल हे समिती पाहिल. त्यासोबत आमची भूमिका आहे, मराठा व ओबीसी या दोन्हींची भूमिका आहे. कुणाच्याही ताटातील कुणाच्या ताटात जाणार नाही, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

आता दोन समाजाला समोरासमोर न येता, दोन्हींचे हक्क न डावलता न्याय देण्याचे काम करायचे आहे. कुणाचे हक्क कुणाला जाणार नाहीत, परवाच्या जीआरमध्ये स्पष्ट आहे. ज्या नोंदणी आहेत, त्या दुर्लक्षित राहिल्या, त्यामुळे दाखले देत नव्हते. या जीआर मुळे ज्या नोंदणी गॅझेटमध्ये आहेत, त्या तपासून नोंदणीप्रमाणे ओबीसी प्रमाण पत्र मिळणार आहे, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली. आताच्या आंदोलकांची मागणी हीच होती, ज्या नोंदणी आहेत त्यांना प्रमाणपत्र द्या. वडिलांची नोंद असेल तर मुलाच्या नोंदीची गरज नाही, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ सप्टेंबर २०२५


## बाबूराव माणिकराव पाटिल औराळकर माध्यामिक विद्यालय कळंकी शाळेत शिक्षक दिन साजरा




**कन्नड (कृष्णा शिंदे) :** कळंकी : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णान यांच्या जयंतीनिमीत्त शाळेत ' शिक्षक दिन ' साजरा करणात आला डॉ. सर्वपल्ली राधकृष्णन यांच्या प्रतिमेस पृष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानिमीत्त शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावली. शाळेत वर्गात शिकवणाचा अनुभव घेतला. शिक्षणाचे हक्क आणि कर्तव्य हे विद्यार्थ्यांनी समजुन घेतले. विद्यार्थ्यांनी - शिक्षकाची भूमिका शिकवत असतांना त्यांना आलेला अनुभव व्यक्त करून, अनेक गंमतीदार गोष्टी सांगितल्या शिक्षकांच्या काम विद्यार्थ्यांनी अनुभवले मुख्यापिका म्हणून धनश्री थोरात, शिक्षिका - कावेरी निंबाळकर, सविता पथवे, सुनिता मंगाळ, सुनंदा पथवे, पल्लवी कदम, आदिती थोरात, राजविर थोरात, शिपाई - संकेत निंबाळकर,संतोष पोकळे यांनी काम पाहिले.

## अब्दीमंडी येथे श्रीमद् भागवत ज्ञानामृत सप्ताह

**दौलताबाद (जावेद अहमद) :** श्री परमपूज्य ब्रम्हलिन पै. किसनराव दामोधर नाईक यांचे कृपाशीर्वादाने प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही श्रीमद् भागवत ज्ञानामृताचा भव्यदिव्य सोहळा संपन्न होत आहे.श्रीमद् भागवत ज्ञानामृत सप्ताह चे हे ९९, वे वर्ष पूर्ण करत आहेव्यासपीठ प्रमुख व्यंकटेश नाईक, चंद्रकांत नाईक हे भागवत कथामृत वाचन करत आहे वेळ सकाळी ,९ते १व दु. २ ते ५ असे आहेभाद्रपद ०९ शके २९४७ रविवार दि.०७ दु.तीन वाजता ग्रंथ मिरवणूक होईल तरी सर्व भाविकांनी या भक्तिरसाचा स्वाद श्रवण करून आपले सार्थक करून घ्यावे.व नंतर काल्याचे किर्तन ह.भ.प. विनायक महाराज अष्टेकर सोमवार, दि. ०८स.१० ते १२ वाजेपर्यंत किर्तन होईल व महाप्रसाद होईल व गोकर्ण वाचन दुपारी चार वाजता नित्य हरिपाठ व सांकिर्तन ह.भ.प. परमेश्वर महाराज कोरडे देवगिरी दौलताबाद हे करत आहेया कार्यक्रमचे आयोजन समस्त नाईक परिवार यांच्या वतीने आयोजित करण्यात येत आहे

## महानगरपालिका चिकलठाणा शाळेत शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेमध्ये स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला या प्रसंगी इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी इतर वर्गाच्या विद्यार्थ्याला अध्यापनाचे कार्य केले व प्रभारी मुख्याध्यापक म्हणून इयत्ता दहावीची विद्यार्थिनी मारिया बेग हिने नियोजन केले. व इतर विद्यार्थ्याने इतर वर्गाना अध्यापनाचे तास घेतले तसेच खेळाचे तास घेतले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून श्रीमती मनीषा शिंदे, श्रीमती अरुणा फुलंब्रीकर, सूर्यवंशी सर, श्रीमती अनुजा भिंगोले श्रीमती अर्चना भारद्वाज, श्रीमती बेबी राऊत, श्रीमती विद्या सासवडे, श्री वसंत राठोड श्री जाहेद पठाण यांनी केले तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रभाकर शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच केंद्रीय मुख्याध्यापक चौधरी सर यांनी विद्यार्थ्यांचे कोतुक केले

## जे.ई.एस. महाविद्यालयात भारतीय दूरसंचार निगम व पोलीस सायबर सेल तर्फे जनजागृती कार्यक्रम




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** भारतीय दूरसंचार नियमक प्राधिकरण भारत सरकार व संगणकशास्त्र विभाग जेईएस महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने "ग्राहक जागरूकता व सायबर सेक्युरिटी "या विषयावर जालना येथील जेईएस महाविद्यालयाच्या चुनीलाल गिरीलाल सभागृह जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ . सुमंत बिक्कड व आयक्यूएससी समन्वयक डॉ. गणेश रोकडे आणि ट्रायचे सीनियर रिसर्च के मुरलीधर, श्री मनीष राठोड सर जॉइंट ॲडव्हायझर ऑफ ट्राय श्री सुदर्शन संगणक विभाग प्रमुख डॉ. राजेश सरकटे श्रीमती शिल्पा कावणा उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ राजेश सरकटे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात श्री मनीष राठोड सर यांनी दूरसंचार क्षेत्रातील ग्राहकांचे महत्त्व व अधिकार याविषयी प्रेझेंटेशन सादर केले. द्वितीय सत्र मध्ये जालना पोलीस सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक श्री योगेश चव्हाण यांनी सायबर विश्वातील होणारे गुन्हे धोके आणि त्यापासून बचाव यासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे प्रश्न आणि त्यावरचे उत्तरे देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा .दिव्या वर्मा यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन प्रा.ऐश्वर्या टोटे यांनी केले .या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक~ शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ~विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ सप्टेंबर २०२५


## सखी सावित्री समिती तर्फे किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन सत्राचे आयोजन



**लाडसावंगी :** पी. एम. श्री. जिल्हा परिषद प्रशाला, लाडसावंगी.ता.जि.छ.संभाजीनगर येथे प्रशालेतील सखी सावित्री समिती तर्फे 350 किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन जनजागृती व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.किशोरवयीन मुलींना अनेक प्रकारच्या शारीरिक,मानसिक,भावनिक बदल आणि त्याअनुषंगाने येणाऱ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. याच वयात मासिक पाळीची सुरुवात होते. मासिक पाळी विषयी समाजात असलेली नकारात्मकता, अंधश्रद्धा, अज्ञान यामुळे या मुली बावरतात. अबोल होतात. या सर्व समस्या लक्षात घेवून शाळेतील सखी सावित्री समिती अंतर्गत मुख्याध्यापक श्री गोरखनाथ नजन यांनी स्त्रीरोग तज्ज्ञांना आमंत्रित करून या सत्राचे आयोजन केले.डॉ. हेडगेवार रुग्णालय,छ.संभाजीनगर येथील स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. मंजिरी मांडे यांनी मुलींना मासिक पाळीविषयक शास्त्र शुद्ध माहिती सांगितली. प्रतिकृती द्वारे गर्भाशयाची रचना व कार्य स्पष्ट केले. तज्ञाकडून मुलींनी त्यांच्या अनेक समस्यांचे निराकरण करून घेतले. तसेच किशोरी विकास प्रकल्प च्या समन्वयक श्रीमती मंदा वैष्णव यांनी किशोरवयीन मुलीं मध्ये घडणारे मानसिक,भावनिक बदल, मैत्री, प्रेम, आकर्षक यातील फरक याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रसंग शाळेतील विज्ञान शिक्षिका राज्य मासिक पाळी व्यवस्थापन सुलभक श्रीमती सारीका जैन यांनी मुलींना समाजातील अंधश्रद्धेला शास्त्रशुद्ध माहितीच्या आधारे सामोरे जाऊन मासिक पाळी ही समस्या नसून समाधान आहे याविषयी जनजागृती करण्याचे आवाहन केले आणि मान्यवरांचे आभार व्यक्त केले. प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

## श्री. सरस्वती भुवन प्रशाला भराडी तालुक्यातून प्रथम




**भराडी :** दिनांक १२ ऑगस्ट २०२५ या दिवशी सिल्लोड येथे पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या पार पडलेल्या तालुकास्तरीय विज्ञान मेळावा या प्रदर्शनामध्ये ,श्री सरस्वती भुवन प्रशाला भराडी या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. प्रशालेतील विद्यार्थिनी कु. वैष्णवी भगवान शिंदे( वर्ग नववा )या विद्यार्थिनीने कॉटम युग: संभाव्यता व आव्हाने या विषयावर सादरीकरण करून, शैक्षणिक ध्वनी चित्रफितीद्वारे उत्कृष्ट सादरीकरण केले. या सादरीकरणानिमित्त ७९.८९% टक्के गुण प्राप्त करून वैष्णवी शिंदे यांनी २३ स्पर्धकांमधून प्रथम क्रमांक पटकावला .या यशाबद्दल शालेय समितीचे अध्यक्ष नरेंद्रजी अग्रवाल .प्रशालेचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री राजेंद्र कोठावदे . उपमुख्याध्यापक श्री सुनील महालपुरे ,पर्यवेक्षक श्री बोरसे सर यांनी अभिनंदन केले.तसेच विज्ञान विभाग प्रमुख श्री शामकांत पाचपुते आणि विज्ञान विभाग सहप्रमुख श्री लोलपोड साईनाथ आणि सर्व शिक्षकांनी प्रसंगी सहकार्य केले. या यशाबद्दल परिसरातून सर्व पालक, विद्यार्थी आणि शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

## उद्योजक शरणाप्पा धुम्मा यांच्या मुलीचा वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जि. प. कन्या प्रशाला मुरूम शाळेत रोटरी क्लब मुरूम सिटी पदाधिकारी व मुरूम नगरीचे सुप्रसिद्ध उद्योजक रोटेरियन शरणाप्पा धुम्मा यांच्या मुलीचा वाढदिवस विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जि. प. कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक शेके हरी ग्यानबा हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रोटेरियन डॉ. नितीन डागा, रोटेरियन कलाप्पा पाटील, रोटेरियन बदोले, रोटेरियन शिवानंद स्वामी इत्यादी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वाढदिवस कार्यक्रमाच्या प्रस्ताविक पर मनोगतात रोटेरियन डॉ. नितीन डागा यांनी रोटरीच्या कार्यप्रणालीची माहिती देऊन ते तळागाळातील शेतकरी, पर्यावरण, शिक्षण,आरोग्य यासाठी सतत प्रयत्न करते. त्यासाठी नियमित वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करून त्याचा लाभ गरजूना करून दिला जातो अशी माहिती दिली. त्यानंतर कु.स्वरा शरणाप्पा धुम्मा वाढदिवस जि. प.कन्या प्रशाला व रोटरी सिटी क्लब मुरूम यांच्या संयुक्त विद्यमाने शाल, फेटा , पुष्पहार घालून व केक कापून साजरा करण्यात आला.स्वराच्या वाढदिवसानिमित्त मनोगत व्यक्त करताना रोटे कल्लप्पा पाटील म्हणाले,"शाळेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मुरूम रोटरी सिटी क्लब कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली तर रोटेरियन शरणाप्पा धुम्मा यांनी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती पुस्तके देण्याच्या आश्वासन दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जाधव वंदना जयराम यांनी केले तर आभार श्रीमती कुलकर्णी रेणुका देवीदास यांनी मानले. वंदे मातरम गीताने कार्यक्रमाचे सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी गायकवाड, महादेव कुनाळे, डॉ.जाधव वंदना, सोनाली कलशेट्टी ,कुलकर्णी रेणुका, बिना पोतदार, सविता साळुंखे अलका गायकवाड,लक्ष्मीकांत महामुनी, नरवटे अश्विनी,साधू गायकवाड,परिचर तात्या जाधव या सर्वांचे सहकार्य लाभले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ सप्टेंबर २०२५


## अंकुश गडदे यास स्विमिंग मध्ये ब्राँझपदक




**छत्रपती संभाजीनगर :** (दि .०३ ) डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि सरस्वती भुवन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन स्विमिंग स्पर्धा आज दि . ०३ सष्टेंबर रोजी नुकत्याच विद्यापीठ येथील स्विमिंग पुल येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या अनेक महाविद्यालयाने सहभाग घेतला .आपल्या महाविद्यालयाचा बी ए . प्रथम वर्षात शिकत असलेलला खेळाडू चि. अंकुश रामप्रसाद गडदे याने २०० मी . प्रिस्टाईल स्पर्धेत ब्रॉझपदक पटकावले. या खेळाडूला क्रीडा विभाग प्रमुख डॉ. प्रविण भोसले यांनी मार्गदर्शन केलेतर खेळाडूचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर सचिव कमलाकर चौसाळकर उपाध्यक्ष गणपत व्यास कार्यकारी उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर कोषाध्यक्ष डॉ. शैलेष वैदय क्रीडा प्रबोधिनीचे मार्गदर्शक रमण सोनवळकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत देशमुख उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के कार्यालयीन अधिक्षक श्रीहरी रामदासी सर्व प्राध्यापक प्राध्यापिका यांनी अभिनंदन केले

## अनाथांचे नाथ शिक्षक

अनाथांचे नाथ शिक्षक
प्रेरणेचा स्रोत शिक्षक
करी जगताचा उध्दार
शिक्षक तूच रक्षक

देऊन बालका ज्ञान
चिमणपाखरा बळ देई
बनवून तया महान
स्वप्नाचा वेद घेई

जगूनी जीवन कष्टानं
ज्ञान वाटे जगास
खडू, फळयाचा पुजारी
पंढरी समजे शाळेस

आकार देई जीवनास
शिक्षक तो श्रेष्ठ
घडवी नव्या पिढीस
अज्ञान करी नष्ट

गुरुवर्य तुम्ही महान
अंधारातून करुनी मार्गक्रमण
जगतास दाखवी प्रकाशमार्ग
गुरुजी तुम्ही महान


शब्दरचना
**संदिप वाकडे पाटिल**
कस्तूरबा इंग्लिश स्कूल चापानेर,
ता. कन्नड, जि.औरंगाबाद







## कितीही उपसमित्या बनवल्या तरी आरक्षण मिळवणारच : मनोज जरांगे



**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी ओबीसी समाजासाठी सरकारने स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे स्वागत केले आहे. असे असले, तरी मराठ्यांना ओबीसीमध्ये समाविष्ट करून आरक्षण मिळवून देण्याची जबाबदारी आपलीच असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तसेच त्यांनी सरकारकडे विविध समाजासाठी उपसमित्या स्थापन करण्याची मागणी केली. 'कोणी कितीही उपसमित्या केल्या, माझ्याबाबत अफवा पसरवल्या, तरी मराठ्यांना आरक्षण मीच मिळवून देणार,' असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. ते आज छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

मनोज जरांगे म्हणाले, ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली, ही चांगली बाब आहे. गोरगरीब ओबीसींचे काम होणार असेल, तरी ही चांगली गोष्ट आहे. त्यावर आमची काही हरकत नाही. पण मी माझ्या समाजाला आरक्षण मिळवून देण्यास सक्षम आहे. कोणी कितीही उपसमित्या केल्या, टोळ्या माझ्या अंगावर पाठवल्या, राजकारणी लोकांचे ऐकून मराठवाड्याचा काढलेला जीआरबाबत कितीही अफवा पसरवल्या, तरी माझ्या गरिबाला आरक्षण मी देतोय, हे मराठ्यांना पटलेले आहे. त्यामुळे आम्ही टेन्शन घेत नाही. ओबीसीत मराठ्यांना मीच घालणार, असेही मनोज जरांगे यांनी ठामपणे सांगितले. मराठवाड्यातील मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय, मी आणि माझा समाज मागे हटणार नाही. त्यामुळे कितीही काही झाले, तरी आम्हाला त्याचा फरक पडत नाही.

ओबीसी समाजासाठी उपसमिती स्थापन केल्याबद्दल जरांगे यांनी समाधान व्यक्त केले, मात्र त्याचसोबत इतर समाजासाठीही अशाच समित्या स्थापन करण्याची मागणी त्यांनी केली. ओबीसी समाजाला जशी उपसमिती गठीत केली, तशी दलित मुस्लिमांसाठी देखील उपसमिती गठीत करा. एक उपसमिती शेतकऱ्यांसाठी करा. आदिवासींसाठी एक करा आणि मायक्रो ओबीसीसाठी एक उपसमिती करा. कारण ओबीसीची उपसमिती मायक्रो ओबीसीसाठी काही कामा येणार नाही. असे मतही त्यांनी यावेळी मांडले. महामंडळ केल्याप्रमाणे या उपसमित्या तयार करा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

जरांगे यांनी या वेळी छगन भुजबळ यांच्यावर थेट टीका केली. छगन भुजबळ हे कार्यकर्त्यांचे आणि पक्षांचे राजकीय अस्तित्व संपवणारा माणूस आहे. त्यामुळे बावनकुळे त्यांना चांगले वाटले असतील. ओबीसी उपसमितीचा अध्यक्ष कुणालाही केले, तरी मला काय करायचे आहे. तो माझा विषय नाही, असे सांगत त्यांनी बावनकुळे यांच्यावर थेट टिप्पणी करणे टाळले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ सप्टेंबर २०२५

# आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन : नि:स्वार्थ सेवेतून उमलणारे मानवतेचे दर्शन

समाजात प्रत्येक जण सारख्या संधींनी, सारख्या साधनसंपत्तीने, सारख्या सुखसोयींनी जन्माला येत नाही. कोणाकडे भौतिक संपत्तीची रेलचेल असते तर कोणाला दोन वेळचे जेवणही परवडत नाही. कोणाला शिक्षणाच्या संधी सहज उपलब्ध होतात तर कोणाला दारिद्र्यामुळे शाळेच्या दारातही पाऊल ठेवता येत नाही. कोणाकडे आधुनिक वैद्यकीय सेवा असतात तर कोण जीव वाचवण्यासाठी औषधांच्या अभावाने तडफडत राहतो. या असमानतेच्या जगात माणसाला माणसाचा आधार आवश्यक ठरतो. मानवाच्या इतिहासात जर काही मूल्ये शाश्वत ठरली असतील तर त्यामध्ये करुणा, सहानुभूती, मदतीची वृत्ती आणि नि:स्वार्थ सेवा या मूल्यांचा नक्कीच समावेश होतो. माणूस हा सामाजिक प्राणी आहे, ही संकल्पना केवळ समाजशास्त्रापर्यंतच मर्यादित नाही तर ती मानवी अस्तित्वाची मूलभूत अट आहे. माणूस एकटा जीवन जगू शकत नाही. त्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त होतो तो एकमेकांच्या सहकार्याने, आधाराने, प्रेमाने आणि सेवाभावाने. धर्मादाय कार्य हीच त्या सहजीवन संस्कृतीची मूळ प्रेरणा आहे. याच भावनेच्या स्मरणार्थ दरवर्षी 5 सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' साजरा केला जातो.

दरवर्षी 5 सप्टेंबर रोजी साजरा केला जात असलेला हा 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिवस मदर तेरेसा यांच्या स्मृतिदिनाशी जोडलेला आहे. कलकत्त्याच्या गल्लीबोळांत निराधार, भुकेले, रोगग्रस्त, निराश्रित यांना त्यांनी उचलून घेतले. त्यांनी त्यांना केवळ औषधे वा अन्न दिले नाही, तर मातेच्या मायेने जिवाला आधार दिला. त्यांची सेवा नि:स्वार्थतेची खरी परिभाषा होती. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने 17 डिसेंबर 2012 मध्ये 5 सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली. या निर्णयामुळे धर्मादाय कार्याचे महत्त्व जागतिक स्तरावर अधोरेखित झाले. भारतीय संस्कृतीत धर्मादाय हा जीवनाचा अविभाज्य घटक राहिला आहे. आपल्या संस्कृतीत 'अन्नदानं परमं दानं' असे म्हटले आहे. धर्मादाय कार्य ही मानवी संस्कृतीतील नवी संकल्पना नाही. भारतीय संस्कृतीत तर ती अनादिकालापासून रुजलेली आहे. 'दान' हे जीवनमूल्य आपल्या परंपरेत विशेष महत्त्वाचे मानले गेले. अन्नदान, जलदान, विद्यादान, गोदान, भूमीदान अशा अनेक प्रकारांनी दानधर्म आपल्या समाजजीवनाचा पाया ठरला आहे. प्राचीन काळात राजा असो वा प्रजा, सर्वांनी आपल्याकडील थोडेफार साधनसंपत्ती समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करणे हे आपले कर्तव्य मानले. त्यामुळे धर्मादाय कार्य हा केवळ धार्मिक कृत्यांचा भाग नसून, तो मानवी जीवनशैलीचा अविभाज्य घटक बनला आहे. संतपरंपरेतील संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांसारख्या संतांनी परोपकाराचे महत्त्व सांगितलेले असून या तत्त्वाने आपले समाजजीवन समृद्ध झाले.

आजच्या आधुनिक जगात धर्मादाय कार्याची व्याप्ती आणखी विस्तृत झाली असून धर्मादाय कार्याने नवे आयाम घेतले आहेत. पूर्वीचे दान हे प्रामुख्याने वैयक्तिक पातळीवर होत असे; आता ते संस्थात्मक स्वरूपात विस्तारले आहे. हे कार्य केवळ धार्मिक वा पारंपरिक कृत्यापुरते मर्यादित न राहता शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, बालकल्याण, कौशल्यविकास, आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत सक्रिय झाले आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, अनाथ मुलांना निवारा, ग्रामीण भागात आरोग्यशिबिरे, अपंगांसाठी साधने, महिलांना स्वावलंबनासाठी मदत अशा असंख्य स्वरूपांत धर्मादाय कार्य पुढे येत आहे. स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संघटना, सामाजिक चळवळी, धार्मिक ट्रस्ट, तसेच औद्योगिक घराण्यांनी उभारलेले 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' उपक्रम या सगळ्यांनी धर्मादाय कार्याला नवीन दिशा दिली आहे. धर्मादाय म्हणजे केवळ पैशाची देणगी नव्हे, तर वेळ दान करणे, ज्ञान वाटणे, रक्तदान करणे, अवयवदान करणे, पर्यावरणासाठी झाडे लावणे, एखाद्या दु:खी व्यक्तीचे बोलणे शांतपणे ऐकणे हीसुद्धा धर्मादायाचीच रूपे आहेत. कधी कधी भावनिक आधार देणे हे भौतिक मदतीपेक्षा जास्त मौल्यवान ठरते. त्यामुळे धर्मादायाचा खरा अर्थ म्हणजे आपल्याकडील कोणतेही साधन नि:स्वार्थ भावनेने इतरांच्या हितासाठी वापरणे होय. जगभरात धर्मादाय कार्याने समाजाला दिलासा दिला आहे. आफ्रिकेत उपासमारीविरुद्ध लढणाऱ्या संस्था, युद्धग्रस्तांना मदत करणारे स्वयंसेवक, नैसर्गिक आपत्तींमध्ये धावून जाणारे कार्यकर्ते हे सर्व धर्मादाय वृत्तीचे उदाहरण आहेत. भारतातही पूर, दुष्काळ, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या आपत्तींच्या वेळी धर्मादाय संस्था पीडितांना मदत करतात. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात धर्मादाय कार्याची खरी ताकद दिसली. रुग्णांसाठी ऑक्सिजन, औषधे, अन्नधान्य पुरवणे, अंत्यसंस्कार व्यवस्थेत मदत करणे या सेवेमुळे लाखो जीव वाचले. धर्मादाय कार्याचे खरे सामर्थ्य समाजात दीर्घकालीन बदल घडवण्यात आहे. एका भुकेल्याला अन्न देणे आवश्यक आहेच; पण त्याला शिक्षण, रोजगाराची संधी देणे अधिक परिणामकारक ठरते. धर्मादायाने व्यक्तींना आत्मनिर्भर बनवले पाहिजे. दारिद्र्य, निरक्षरता, बेरोजगारी, विषमता कमी करण्यासाठी धर्मादाय कार्याने दीर्घकालीन उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.

आजची तरुणाई या कार्यात सक्रिय झाली आहे. 'रॉबिनहूड आर्मी'सारखे गट उरलेले अन्न गोळा करून भुकेल्यांपर्यंत पोहोचवतात. 'युथ फॉर सेवा'सारख्या संस्था ग्रामीण भागात आरोग्य आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देतात. महाविद्यालयीन विद्यार्थी 'राष्ट्रीय सेवा योजना' आणि राष्ट्रीय छात्र सेना' द्वारे गावोगावी जाऊन शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवतात. 'सोशल मीडियाच्या मदतीने निधी संकलन, रक्तदान मोहिमा, शैक्षणिक साधनांची उभारणी या उपक्रमांमध्ये युवकांची मोठ्या प्रमाणात भागीदारी दिसत असून हीच नवी पिढी धर्मादाय कार्याचा चेहरा बदलत आहे. तथापि, धर्मादाय क्षेत्रात काही आव्हानेही आहेत. काही संस्था निधीचा अपव्यय करतात, पारदर्शकता नसते, बनावट उपक्रम राबवले जातात. या सर्वांमुळे धर्मादाय कार्याची विश्वासार्हता डळमळते. म्हणूनच या कार्यात प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि पारदर्शकता आवश्यक आहे. धर्मादाय कार्य हे प्रसिद्धीच्या हव्यासापोटी नसून नि:स्वार्थतेच्या भावनेतूनच व्हायला हवे. धर्मादाय कार्याचा लाभ फक्त गरजूंनाच नाही, तर दान करणाऱ्यालाही होतो. दानातून मिळणारा अंत:करणातील आनंद, समाधान आणि शांतता हे पैशाने विकत घेता येत नाही. म्हणूनच धर्मादाय हा केवळ सामाजिक कर्तव्य नसून जीवन जगण्याची एक अर्थपूर्ण पद्धत आहे.

'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' आपल्याला आठवण करून देतो की आपण या समाजाचे देणे लागतो आणि ते परत करण्याचा एक मार्ग म्हणजे धर्मादाय कार्य करणे होय. मोठ्या देणग्यांची आवश्यकता नाही; लहान कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवतात. वाढदिवशी रक्तदान करणे, सण-समारंभामध्ये गरीबांना अन्नदान करणे, वाचनालयासाठी पुस्तके देणे, एखाद्या अनाथ मुलाच्या शिक्षणाचा खर्च उचलणे अशा छोट्या छोट्या कृतींचे मूल्य अनमोल आहे. मदर तेरेसा म्हणत असत की, 'आपण जे करतो ते समुद्रातील एक थेंब आहे; पण त्या थेंबाशिवाय समुद्र अपूर्ण आहे.' आपण प्रत्येकाने आपापला तो थेंब दिला तर समाजात करुणा, समानता आणि माणुसकीचे खरे साम्राज्य निर्माण होईल. नि:स्वार्थ सेवेतून उमलणारे हे मानवतेचे दर्शनच जगाचे खरे वैभव आहे, आणि त्याच दर्शनाचा गौरव करण्यासाठी आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन आपल्याला अंतर्मुख करतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. 9960103582, ईमेल –**
**bagate.rajendra४@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002